# त्रासदायक 'विश्रांती'

अमेरिका आणि इराण यांनी काही दिवसांसाठी युद्धविश्रांती घेण्याची ही काही पहिली वेळ नाही. १०७ दिवसांच्या युद्धकाळात यापूर्वी दोनदा अशी युद्धविश्रांती जाहीर केली गेली आहे. एप्रिल आणि मेच्या पहिल्या आठवड्यात. या दोन्ही वेळी ही विश्रांती चार दिवसही टिकली नाही.

इराण-अमेरिकेतला संघर्ष साधारण दोन महिन्यांसाठी थांबवण्याचा निर्णय दोन्ही देशांनी घेतला असला, तरी या दोन्ही देशांसह जगातल्या कुठल्याच देशांच्या नागरिकांचा त्यावर विश्वास नाही. विश्वास न बसण्याला प्रामुख्याने कारणीभूत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि दुसरे इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू. अमेरिका आणि इराण यांनी काही दिवसांसाठी युद्धविश्रांती घेण्याची ही काही पहिली वेळ नाही. १०७ दिवसांच्या युद्धकाळात यापूर्वी दोनदा अशी युद्धविश्रांती जाहीर केली गेली आहे. एप्रिल आणि मेच्या पहिल्या आठवड्यात. या दोन्ही वेळी ही विश्रांती चार दिवसही टिकली नाही. पहिल्या वेळी अमेरिका आणि इराणने प्रामाणिकपणा दाखवला नाही म्हणून आणि दुसऱ्यांदा नेतान्याहू यांनी लेबनॉनवर हल्ला केला म्हणून. यावेळी ट्रम्प आणि इराण या दोघांनीही शांतता करार करण्यास सहमती दर्शवून त्यावर सह्याही केल्या असल्या तरी अंतिम करार शुक्रवारी जिनेव्हामध्ये व्हायचा आहे. शांतता करार करण्यास इराण ज्या कारणासाठी तयार झाला, त्यातली काही कलमं आम्ही कबूल केलेली नाहीत; आमची त्यांना मान्यता नाही, असं म्हणायला ट्रम्प यांनी दुसऱ्याच दिवशी सुरुवात केली आहे. त्यामुळे, प्रत्यक्ष शांतता करारावर सह्या होत नाहीत, तोपर्यंत त्यावर विश्वास ठेवणं कोणासाठीही जडच असणार आहे. पुन्हा करार झाल्यानंतरही त्यातली कलमं दोघेही पाळतीलच, याची शाश्वती नाही. कारण दोन्ही देशातल्या याबाबतच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. इराणमध्ये तर शांतता कराराच्या कल्पनेला कट्टरवाद्यांनी त्याच दिवशी उघड विरोध सुरू केला. ट्रम्प यांच्या हाती काहीच लागलं नाही, उलट इराणला द्यायची नुकसान भरपाई अंगावर आली, तर अमेरिकेत ट्रम्प यांची खैर नाही. मध्यावधी निवडणुकांच्या तोंडावर ट्रम्प यांना ते परवडणार नाही. त्यामुळे, युद्ध थांबणार असेल आणि पश्चिम आशियात शांतता प्रस्थापित होणार असेल, तर त्यासारखं समाधान नाही. पण, नुसत्या कागदावरच्या कराराने हे समाधान मिळण्याची शक्यताही नाही. त्यासाठी दोन्ही बाजूंनी प्रामाणिकपणे प्रयत्न झाले पाहिजेत. कतार आणि पाकिस्तान या दोघांनाही या शांतता कराराचं श्रेय मिळवायचं असेल, तर यानंतरच खरे कष्ट उपसावे लागणार आहेत. युद्धविश्रांतीतले 'किंतु- परंतु' जितके कमी होतील, तितकी या कराराच्या अंमलबजावणीची शक्यता वाढेल!

भारत आणि भारतासारख्या अन्य देशांच्यादृष्टीने होमुर्झची सामुद्रधुनी जलवाहतुकीला पूर्वीसारखी खुली होणं सगळ्यात जास्त महत्त्वाचं आहे. कारण, भारतासाठी ऊर्जा साधनांची बहुतेक सगळी आयात या सामुद्रधुनीतूनच होते. अमेरिका आणि इराण हे दोन्ही भारताचे मित्र देश, इस्रायलशी खास दोस्ती आणि आखातातील अरब देशांशी निकटचे सांस्कृतिक- व्यापारी संबंध असूनही गेल्या १०७ दिवसांत भारताची चांगलीच कोंडी झाली, हे कुणाला नाकारता येणार नाही. गेल्या आठवड्यात तर भारताच्या तीन जहाजांवर अमेरिकेकडूनच हल्ले झाले! अगदी या घडीलाही भारताची १३ इंधनवाहू जहाजं त्यावरच्या ३२५ कर्मचाऱ्यांसह सामुद्रधुनीत वाईट पद्धतीने अडकलेली आहेत. आपलं इंधन अवलंबित्व किती घातक आहे; आणि ते कोण्या एक-दोन देशांच्या भरवशावर ठेवणं आत्मघात आहे, याचा साक्षात्कार या युद्ध काळात भारताला झाला, ही सगळ्यात चांगली गोष्ट आहे. विक्षिप्त-बेभरवशी ट्रम्प, निर्नायकी इराण किंवा आपमतलबी नेतान्याहू यांच्या नादी न लागता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या तीन महिन्यांत इंधन पुरवठ्याचे वेगवेगळे मार्ग शोधायला सुरुवात केली, ही भारताच्या दृष्टीने भविष्यासाठी सर्वाधिक दिलासादायक बाब आहे. ६० दिवसांची युद्धविश्रांती खरोखर अमलात आलीच, तर पुन्हा या पेचात न अडकण्यासाठी ज्या उपाययोजनांचा विचार केला आहे, पर्यायी व्यवस्था उभारण्याचा प्रयत्न आहे, त्याची व्यवहार्यता तपासून बघता येईल. पुढची बेगमीही करता येईल. ऐन खरिपाच्या तोंडावर युरिया, डीएपी, एनपीके आणि तत्सम खतांचा प्रश्न चिंतेचा झाला होता. युद्धविश्रांतीची बातमी येताच आंतरराष्ट्रीय बाजारातील युरियाचे भाव उतरले आहेत. नैसर्गिक वायूचा पुरवठा सुरळीत झाला, तर काही खतांचं उत्पादनही भारतात लगेच सुरू होण्याची शक्यता आहे. इथल्या शेतकऱ्यांना तो मोठाच दिलासा असेल. त्यादृष्टीनेही अमेरिका - इराण संघर्षात 'शांतीदूत' म्हणून जे देश पुढे आले आहेत, त्या पाकिस्तान वा कतारचं हे खरं रूप नाही. जगाच्या लेखी त्यांना तशी किंमतही नाही. पण, ट्रम्प यानिमित्ताने त्यांचे महत्त्व कसे वाढवत आहेत, याची गंभीर नोंद भारताला घ्यावीच लागेल.

युद्ध सुरू झालं, तेव्हा ट्रम्प भलतेच गुर्मीत होते. ते कोणाचं ऐकून घेण्याच्या स्थितीत नव्हते. ट्रम्प आणि नेतान्याहू एका बाजूला होते. १०७ दिवसांनंतर परिस्थितीत अगदी १८० अंशांनी नाही; तरी १०७ अंशांनी नक्कीच फरक पडला आहे. ट्रम्प आणि नेतान्याहू यांचं तसं सख्य राहिलेलं नाही. किंबहुना ट्रम्प यांच्या शांती प्रयत्नात नेतान्याहूच खोडा ठरताहेत म्हणून ट्रम्प यांनी त्यांच्यावरही तोंडसुख घेऊन झालं आहे. इस्रायलचे संरक्षण मंत्री इतामार बेन-ग्विर यांनी परवाच 'आमचा या कराराशी काही संबंध नाही' असं सांगून लागलीच हात झटकले आहेत. दक्षिण लेबनॉन, गाझा आणि सिरीयाचा जो भाग युद्धकाळात बळकावला, तिथून आम्ही अजिबात मागे हटणार नाही, हेही त्यांनी जाहीर करून टाकलं आहे. या शांती कराराची घोषणा होण्यापूर्वी काही तास इस्रायलने बैरुतवर हल्ला केलाच आहे! इराणचा अणू कार्यक्रम, त्यांची क्षेपणास्त्र निर्मिती, अरब देशांना असलेला इराणचा धोका, तिथल्या राजवटीतला बदल-यातल्या कुठल्याच मुद्द्यावर स्पष्टीकरण न घेता हा शांती करार का? असा त्यांचा प्रश्न आहे. थोडक्यात, ही युद्धविश्रांती सोपी नाही. बरीच त्रासाची आहे. अशांततेचा कुठला बॉम्ब कधी फुटेल, हे सांगता येणार नाही. जे घडेल, ते पाहण्याखेरीज कोणाकडेच काही उपाय नाही, हे खरं.

# समीक्षेची नाट्य दडपण रजनी

**मराठी** माणूस हा जन्मतःच नाट्यप्रेमी असतो किंबहुना जो नाट्यप्रेमी नाही तो मराठीच नाही असं म्हटलं जातं. या वाक्याचा उत्तरार्ध जर खरा असेल तर, मी पंधरा वर्षाचा होईपर्यंत अमराठी होतो. मग हळूहळू मी वर्षाला एकदा चर्चच्या सणानिमित्त आमच्या वसईतील गावात आलेलं मुंबईचं नाटक पाहणारा गावकुसाबाहेरचा मराठी झालो. तिथून सुरुवात करून, व्हाया एकांकिका स्पर्धा, स्वस्तात बघायला मिळणाऱ्या राज्य नाट्य स्पर्धा ते महिन्याला तीन-चार व्यावसायिक, प्रायोगिक नाटकं पाहणारा अभिजात मराठी माणूस व्हायला मला दहा-पंधरा वर्षे लागली.

अनेक बरीवाईट नाटकं पाहिल्यामुळे एकदाचा माझ्या डोमिसाईल सर्टिफिकेटवर मराठी असल्याचा शिक्का बसला आणि मी नाटकातलं फारसं काही कळत नसतानाही कोणत्याही नाटकावर पाहून किंवा न पाहता सुद्धा माझ्या मतांची पिंक टाकायला मुखत्यार झालो. 'कुठल्याही गोष्टींवर बेफाम आणि बेलगाम शेरेबाजी करता येणे' हे देखील मराठीपणाचे व्यवच्छेदक की काय म्हणतात तसे लक्षण असल्याने, ही आजच्या सोशल मीडियाच्या जगात, माझ्या मराठीपणाचा मिळालेली ब्लू टिक किंवा सिल्वर बटन म्हणता येईल.

आज तिकिटालय, रंगभूमी अशी ऑनलाईन तिकिटे बुक करणारी विविध मोबाईल ऍप आलेली असली आणि फोन करून तिकिटे बुक करण्याची देखील सोय असली तरी टूथपेस्टमध्ये कोलगेटला, मिनरल वॉटरमध्ये बिस्लेरीला आणि पापडांत लिज्जतला जी इज्जत आहे तीच इज्जत आजही तिकीट बुकिंगच्या क्षेत्रात 'बुक माय शो'ला आहे. त्यामुळे 'बुक माय शो' वर नाटकाची तिकीट विक्री सुरु झाली की दूर उपनगरातील मंडळी त्यावर उडी घेतात आणि तिकीट मिळताच आयपीएलच्या फायनल मॅचचं तिकीट मिळाल्यागत आपल्या तिकिटाचा स्क्रिनशॉट सोशल मीडियावर टाकून 'मी नाटकाला जातोय, कोण कोण येतंय?' अशी शायनिंग मारून घेतात. नाटक प्रेमी असणे आणि आपण नाटक प्रेमी म्हणजेच अभिजन आहोत असे दाखवणे हेही मराठी आणि बंगाली लोकांचे वैशिष्ट आहे.

जेवणाचा पहिला घास घेण्याआधी त्याचा फोटो घेऊन सोशल मीडियावर टाकणाऱ्या तथाकथित अभिजात मराठी जनांसाठी आपली छोट्यात छोटी अचिव्हमेंट मिरवणे आणि त्यायोगे इतरांना खिजवणे हे न्यू नॉर्मल आहे. थिएटरमधील सुरुवातीच्या रांगांची तिकिटे 'बुक माय शो' वर मिळत नाहीत. त्यामुळे नाटकाला आल्यावर 'बुक माय शो'वरून तिकिटं बुक केलेल्यांनी थिएटरच्या तिकीट विंडोवर तिकिटं घेऊन पहिल्या रांगांत बसलेल्या प्रेक्षकांवर जळणे हादेखील न्यू नॉर्मलचाच भाग आहे.

नाटकाच्या तिकिटाचा फोटो व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम अशा यच्चयावत सोशल मीडिया ऍप्सच्या स्टेटसवर लावणे ही पहिली पायरी, थिएटरला पोहोचल्यावर नाटकांच्या पोस्टरसमोर सेल्फी घेऊन स्टेटसला लावणे ही दुसरी पायरी, भरलेल्या थिएटरमध्ये आपला सेल्फी घेणे ही तिसरी पायरी, नाटक सुरु असताना त्याचे फोटो किंवा गुपचूप छोट्या व्हिडीओ क्लिप्स बनवून पोस्ट करणे ही चौथी पायरी आणि नाटक संपल्यावर ग्रीन रूम मध्ये जाऊन कलाकारांसोबत सेल्फी घेऊन पोस्ट करणे ही पाचवी पायरी अशा प्रकारे मराठी माणूस केवळ नाटक पाहत नाही तर आपण नाटक पाहिलं हे आणि अभिरुचीच्या बाबतीत आम्ही तुमच्यापेक्षा एक पायरी वर आहोत हे लोकांनाही दाखवतो! असं म्हणतात की, मराठी नाटकं माऊथ पब्लिसिटीवर चालतात. कारण मराठी माणसाला नाटक पाहण्यापेक्षा 'मी अमुक अमुक नाटक पाहिलंङ्क हे जगाला ओरडून सांगण्यात जास्त इंटरेस्ट असतो.

तरीही प्रेक्षकांचा असा एक वर्ग आहे जो कोणतं नाटक पाहायचं? एखादं नाटक पाहायचं की नाही? हे वर्तमानपत्रात येणारी अडीच तासांच्या नाटकाची समीक्षा अडीच मिनिटांत वाचून (बऱ्याचदा तर त्या समीक्षेचे शेवटचे दोन परिच्छेद काही सेकंदांत वाचून) ठरवतो. आपण लिहिलेलं समीक्षण वाचून प्रेक्षक नाटक पाहण्याचा निर्णय घेतात या समजुतीने अनेक समीक्षक स्वतःला मराठी रंगभूमीचे तारणहार समजू लागल्याला तसा बराच काळ लोटलाय. रंगभूमी नावाचा हा गोवर्धन आपल्याच समीक्षेच्या करंगळीवर टिकला असल्याची त्यांची भावनाही तशी जुनीच आहे. सेक्रेड गेम्स वेबसिरीज मधल्या गणेश गायतोंडे प्रमाणे ते स्वतःशीच बोलू लागतात 'कभी कभी लगता है कि अपुनीच भगवान है!'

मात्र, कोरोनोत्तर मराठी वृत्तपत्रांचा खालावलेला खप, त्यामुळे कमी झालेली साप्ताहिक पुरवण्यांची पानं आणि वृत्तपत्रात उरल्या-सुरल्या जागेवर जाहिरातींनी केलेलं अतिक्रमण यामुळे नाटकाच्या समीक्षेला मिळणारा एफएसआय आपोआपच कमी झाला आहे. हल्ली तर मराठी पेपरवाले नाटक समीक्षेसाठी जागाच मुळात साडेतीनशे-चारशे शब्द इतकी तुटपुंजी देतात. त्यामुळे समीक्षेची अवस्था मुन्नाभाईच्या हॉस्टेल रूम प्रमाणे 'शुरु होते ही खतम हो गया' अशी झालेली आहे. तरीही मुरारबाजींच्या तडफफेने इंच इंच लढवू म्हणत जमेल तितकी विस्तृत समीक्षा लिहिणारे समीक्षक कौतुकास पात्र आहेत.

मराठी नाटक दिवाणखान्यात आणि मराठी समीक्षा एका चाकोरीत अडकून पडली आहे. त्या चाकोरीप्रमाणे, समीक्षेच्या सुरुवातीच्या परिच्छेदात समीक्षकाला आपल्या आकलनाचे तारे तोडणे कंपलसरीच असतं. त्यामुळे नाटकाचा लेखक, दिग्दर्शक, कलाकार यांनाही ठाऊक नसलेला नाटकाचा अन्वयार्थ आपल्याला समीक्षकांच्या लेखणीतून वाचावयास मिळतो. बऱ्याचदा या परिच्छेदानंतर निर्माता, लेखक, दिग्दर्शक, कलाकार, तंत्रज्ञ ह्यांची नावे आणि प्रत्येकाविषयी एक ओळ लिहिल्यावर नाटकाविषयी फार काही लिहायला जागाच उरत नाही.

धाडसी प्रयोग हा मराठी समीक्षकांचा समीक्षेत वापरावयाचा लाडका शब्दप्रयोग आहे. नाटकाचा विषयच डोक्यावरून गेला. नाटक समजलं नाही. कथा कुठे चाललीय ते कळत नाही. एखाद्या पात्राचं, प्रवेशाचं प्रयोजन काय? नाटकात नाववाले कलाकार आहेत पण ते काय करताहेत हेच कळत नाही. अशा वेळी समीक्षकांच्या मदतीस येणारे हुकमी शब्द म्हणजे धाडसी प्रयोग. जसा कॉम्पुटर हँग झाल्यावर आपण Ctrl+Alt+Del दाबून रिस्टार्ट करतो त्याच प्रमाणे नाटक पाहताना आणि नाटकावर लिहिताना समीक्षकाचं डोकं हँग झाल्यावर तो लिहितो धाडसी प्रयोग! या शब्दांचा अर्थ इतकाच कि, 'मला काहीही कळलेलं नाहीये. प्रेक्षकांना काही कळणार नाही कारण त्यांची तितकी लेव्हलच नाहीये. कदाचित दिग्दर्शकाला काहीतरी कळलं असावं! ज्याने त्याने आपापल्या रिस्कवर नाटक पाहावं!

असाच समीक्षकांचा दुसरा लाडका शब्दप्रयोग म्हणजे काही प्रसंगात नाटकाची गती मंदावते. ही खरंतर नाटकाला सभ्य शब्दांत दिलेली शिवीच आहे. अरे, हिंमत असेल तर स्पष्ट लिहा की, नाटक कंटाळवाणं आहे. पण नाही! समीक्षक कधीच सरळ बोलत नाही. नाटक सुरु असताना प्रेक्षक झोपतात, घोरतात हे आजूबाजूला दिसणारे सत्य तो सांगत नाही. इंटरव्हलला माझ्या शेजारचे दोन जण बाहेर गेले, ते परत आलेच नाहीत हे असं सोप्या भाषेत सांगण्याऐवजी तो लिहितो: काही ठिकाणी गती मंदावते.

काही समीक्षा वाचताना वाटतं, हा नाटकाचा रिव्ह्यू आहे की पीएचडीचा थिसीस? आशयाची वानवा असलेले पोकळ शब्दांचे फुगे. उत्तर-आधुनिकतेच्या छटांनी नटलेलं, अस्तित्ववादी प्रश्नांना भिडणारं, कोरोनोत्तरी आयुष्यातील ताण्याबाण्यांना धीटपणे सामोरे जाणारं, मळलेल्या चाकोरीतून जाण्याचं नाकारणारं . . . .' हे परीक्षण वाचणाऱ्या आपल्यासारख्या सामान्य माणसाला प्रश्न पडतो की, 'भाऊ, बाकी सगळं ठीक आहे. पण मला एक सांग, तिकीट काढून नाटकाला जाऊ की नको? चार घटका मनोरंजन होईल की नाही?'

समीक्षक म्हणतो, हे नाटक विचार करायला भाग पाडते. आणि हे वाचून प्रेक्षक म्हणतो, 'नाटकाला गेल्यावर, विचार देखील मीच करायचा असेल तर पैसे देऊन तिकीट तरी का विकत घेऊ? त्यांनीच मला विचार करण्याचे पैसे द्यायला हवेत!'

समीक्षक लिहितो, नाटक प्रेक्षकांना खुर्चीत खिळवून ठेवते हो! हे बाकी खरंय! बऱ्याचदा प्रेक्षक नाईलाजाने खुर्चीला खिळून बसून राहतो. खरंतर त्याला भर नाटकात उठून बाहेर जावंसं वाटतं. पण त्याला खुर्चीशी खिळवून ठेवते ती त्याची सामाजिक प्रतिष्ठा! आपण असे निघून गेलो तर आजूबाजूचे 'चार लोक' काय बोलतील? . . .. माझं तर असं स्पष्ट मत आहे की, नाटक कितीही कंटाळवाणं असलं तरी प्रयोग सुरु असताना मराठी प्रेक्षक शक्यतो उठून जात नाही याबद्दल समस्त नाट्यकर्मींनी श्रेय नामावली वाचताना त्या 'अदृश्य चार लोकांचे' देखील आभार मानायला हवेत!

या नाटकात लेखक काय विचार करतो? दिग्दर्शकाला या नाटकाच्या फॉर्ममधून, मांडणीतून, आकृतिबंधांतून काय सांगायचे आहे? कलाकारांची देहबोली काय आणि कशाप्रकारे व्यक्त होते? हे सगळं गरज नसतानाही समीक्षक आपल्याला सांगतो पण नाटकाला आलेला प्रेक्षक काय अनुभवतो? त्याच्यापर्यंत काय काय आणि किती पोहोचते? प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेण्याची या नाटकाची क्षमता, इंटरव्हलमध्ये मिळणाऱ्या वडापाव आणि चहापेक्षा जास्त आहे की नाही? हे काही केल्या तो सांगत नाही. काही काही समीक्षक, परीक्षणाच्या नावाने जे काही लिहितात त्याला समीक्षा म्हणावी की प्रेस नोट हेच समजत नाही. 'नाटक उत्तम आहे. दिग्दर्शन नेटकं आहे. अभिनय प्रभावी आहे. संगीत समर्पक आहे, प्रकाशयोजना नाटकाच्या जातकुळीला साजेशी ःङ्क हे एक डिफॉल्ट टेम्पलेट ते सगळ्या नाटकांच्या समीक्षेत डोळे झाकून Ctrl+C आणि Ctrl+V करून डकवून टाकतात.

समीक्षकांच्या पोतडीतील आणखी एक क्लासिक वाक्य म्हणजे कलाकारांनी आपापली भूमिका समर्थपणे पेलली आहे. हे इतकं कातडीबचाऊ वाक्य आहे की ते आपण लग्नापासून मयतापर्यंत कुठेही वापरू शकतो. नवरदेवाने आपली भूमिका समर्थपणे पेलली आहे! . . . तिरडीवरील मयत व्यक्तीने आपल्या भूमिकेला पूर्णतः न्याय दिलेला आहे! वगैरे, वगैरे. सोशल मीडियावरील समीक्षक तर आणखीनच भारी. पोस्टच्या सुरुवातीलाच 'स्पॉइलर देणार नाही' असं म्हणतात आणि संपूर्ण कथा त्यातील रहस्य, शेवट सगळं सांगून टाकतात.

जे समीक्षक, 'दुसऱ्या अंकात नाटक खरी पकड घेते' असं वाक्य लिहितात त्यांना पहिला अंक संपल्यावर प्रेक्षक पळून जातील अशी भीती वाटत असण्याची दाट शक्यता आहे. मला असे वाटते की, समीक्षेतील या वाक्याला भुलून जे प्रेक्षक दुसरा अंक बघायला थांबतात त्यांच्या हाती जर समीक्षक लागला तर ते त्याच पकडीने समीक्षकाचा गळा आवळल्यावाचून राहणार नाहीत.

मराठी नाट्यविश्वात दोन गोष्टी कधीच मरत नाहीत. एक म्हणजे नाटकातील प्रयोगशीलता, आणि दुसरी म्हणजे समीक्षकांची करुणा. कारण नाटक कसेही असो, समीक्षा मात्र नेहमी समजूतदारच असते. भाऊ आहे आपला. ह्याच्या नाटकाविषयी बरं लिहिलं पाहिजे हे थिएटरमध्ये शिरण्यापूर्वीच त्याने मनात पक्कं केलेलं असतं. मराठी नाट्य समीक्षक हा एकाच वेळी थोडासा पत्रकार, थोडासा प्रेक्षक आणि थोडासा झठ एजंट असतो. नाटकाविषयी सत्य लिहिलं तर पुढच्या शोचे पास बंद होतील. कलाकारांचे फोन बंद होतील आणि प्रीमियर शो ची आमंत्रणे थांबतील या भीतीने त्या बिचाऱ्याला सत्य लिहिता येत नाही. नाटकात काही उणिवा असल्या तरी हे नाटक एकदा पाहायला हरकत नाही!' म्हणजे उणिवा फक्त आहेत, सांगायच्या नाहीत. आणि आपल्यासारखा सामान्य प्रेक्षक एक नाटक आयुष्यात जेमतेम एकदाच पाहतो. पैसे खर्च करून उणिवा असलेलं नाटक का पहा? पुन्हा पुन्हा तेच नाटक पाहायला वेळ आणि पैसा आहे कुणाकडे?

मराठी नाट्य समीक्षक हा एक वेगळाच प्राणी आहे. तो नाटक बघायला जात नाही, तो आपले नातेसंबंध टिकवायला आणि जुने नातेसंबंध दृढ करायला जातो. नाटक संपलं की प्रेक्षक बाहेर येऊन म्हणतो: काय भंकस होतं! तेव्हा समीक्षक देखील त्याच्याशी मनोमन सहमत असतो. तरीही पेपरमध्ये परीक्षण लिहिताना तो म्हणतो, विषय जरी जुनाच असला तरी तो एका वेगळ्या दृष्टिकोनातून मांडण्याच्या प्रयत्नात लेखक आणि दिग्दर्शक यशस्वी झालेले आहेत.

मराठी नाट्य समीक्षक हा वाईट नसतो, फक्त गरजेपेक्षा जरा जास्तच चांगला माणूस असतो. इतका चांगला की, वाईट नाटकालाही तो प्रेमाने झाकून टाकतो. तो आईच्या मायेने नाटकावर प्रेम करीत असल्याने नाटक या आपल्या अपत्याच्या सगळ्या चुका तो पोटात घालतो. आणि एखाद्या आईने आपल्या उपवर मुलीची तारीफ करीत सुटावे त्याचप्रमाणे नाटकाला, सुंदर, उत्तम, अप्रतिम, देखणा नाट्यानुभव अशी प्रमाणपत्रे देत सुटतो..

'मी उद्यापासून दारू, सिगारेट सोडणार आहे', 'मी एक तारखेपासून जिम जॉईन करणार आहे' हे संकल्प इतरांचेच काय आपल्या स्वतःचे असले तरी आपण मनावर घेत नाहीत. त्याचप्रमाणे पेपरच्या समीक्षेत लिहिलेलं, नाटक अप्रतिम आहे हे विधान देखील आपण अजिबात मनावर घेऊ नये. समीक्षा-बिमीक्षा वाचण्याच्या भानगडीत न पडता, सरळ तिकीट काढून नाटकाला जावं.

नाटक आवडलं तर एन्जॉय करावं, नाही आवडलं तर तिथेच झोपून जावं. कारण नाटक कसंही असो पण नाटकाच्या थिएटरमध्ये येणारी झोप आणि नाट्यगृहात मिळणारा बटाटा वडा अप्रतिमच असतो असा माझा आजवरचा अनुभव आहे!

**- सॅबी परेरा**

# सोशल मीडिया: एकमेकांना संदेश पाठवण्याची सोय

एखाद्या सोशल नेटवर्क सेवेचा पाया म्हणजे एखाद्या व्यक्तीने त्या सोशल नेटवर्किंग संकेतस्थळावर तयार केलेले प्रोफाईल पान अर्थात माहितीचे पान असते. एखाद्या व्यक्तीचा इंटरनेटवरील आविष्कार, रूप किंवा अवतार म्हणजे हे प्रोफाईल पान होय. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळे ही व्यक्तीला अशा प्रकारची प्रोफाईल बनवणे, त्या संकेतस्थळांवरील इतर व्यक्तींशी ओळख व मैत्री करणे तसेच विविध माहितीची देवाण-घेवाण करणे आदींची संधी देतात. अशा या जीवलग सोशल मीडियाबद्दल रोचक माहिती श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी-अलककार देत आहेत... संपादक.

**(१९ जून : सोशल मीडिया- समाज माध्यमे विशेष.)**

इंटरनेटवर उपलब्ध असणारा, विविध व्यक्तींशी संपर्क साधू देणारा व ते जपू देणारा मंच म्हणजे सोशल नेटवर्क सेवा होय. सोशल नेटवर्क अथवा सामाजिक जाळे म्हणजे असे गट जेथे समान विचारांची, सारख्या आवडीनिवडींची माणसे एकत्र येतात. या संज्ञेत जरी प्रत्यक्ष भेट अथवा थेट संवाद अपेक्षित असला, तरी ही संज्ञा इंटरनेटवरील सेवेसही लागू पडते. ही सेवा मुख्यतः इंटरनेटवरील विविध संकेतस्थळांच्या मार्फत पुरवली जाते. अशा संकेतस्थळांना सोशल नेटवर्किंग संकेतस्थळे असे म्हणतात. सोशल नेटवर्किंग व सोशल नेटवर्क या व्याख्या अनेकदा समानार्थी वापरल्या जातात. परंतु नेटवर्किंग या शब्दात अनोळखी व्यक्तींशी देखील नाते जोडणे अपेक्षित आहे; तर सोशल नेटवर्क या शब्दाचा अर्थ व्यापक असून त्यात खऱ्या आयुष्यातील ओळखीच्या लोकांशी देखील इंटरनेटवर नाते जोडणे अपेक्षित असते. सुमारे २०० वर्षांपूर्वी पृथ्वीतलावर जेवढे लोक नव्हते, तेवढे आज एका फेसबुक नामक सोशल नेटवर्कवर आहेत. लोक भाषा, सीमा सर्व विसरून एकमेकांशी जोडण्याच्या भावनेने सोशल नेटवर्कचा भाग होतात. काही लोक हे जुन्या मित्र-मैत्रिणींच्या संपर्कात राहण्यासाठी सोशल नेटवर्कवर येतात.

काही तज्ज्ञांचे असे म्हणणे आहे, की सिक्सडिग्रीज.कॉम हे पहिले सोशल नेटवर्किंग संकेतस्थळ आहे. हे संकेतस्थळ इ.स.१९९७ साली सुरू झाले. सर्वप्रथम येथे सदस्यांना प्रोफाईल- माहिती पान उघडण्याची व मित्रमंडळ तयार करण्यास मुभा दिली. त्यानंतर सन १९९८ साली मित्रमंडळ सूची शोधण्याची मूभा दिली. मात्र या संकेतस्थळाला फारशी प्रसिद्धी मिळाली नाही. परंतु या संकेतस्थळाच्या निर्मितीआधी देखील या प्रकारचा ऑनलाईन संवाद अथवा देवाण-घेवाण घडत असे. प्रोफाईल व संवाद साधणे हे जरी या सेवेचे मूळ उद्दिष्ट असले, तरी सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांची सुरुवात वेगवेगळ्या हेतूंनी झाली. उदा- सायवर्ल्ड हा कोरियन परिसंवाद मंच होता. स्कायरॉक ही सुरुवातीला फ्रेंच ब्लॉगिंग सेवा होती. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांवरील प्रत्येक सदस्याला आपल्या माहितीची काही प्रमाणात गुप्तता राखता येते. मात्र यांवर मर्यादा आहेत. उदा- फेसबुकवरील सदस्याने एखादे ॲप्लिकेशन वापरायच्या आधी एक सूचना येते. त्या सूचनेनुसार त्या सदस्याची माहिती व फोटो वापरण्याची परवानगी फेसबुकला दिली जाते. मात्र ही माहिती कशासाठी वापरणार याची कल्पना सदस्याला नसते. त्याचप्रमाणे फेसबुकवर एखाद्या सदस्याने जरी आपल्या फोटोंविषयी गुप्तता पाळली असेल, तरी त्या सदस्याचे नाव फेसबुकवर शोधले असता काही फोटो दिसतात. हे फोटो मुख्यत्वे त्या सदस्याच्या मित्रमंडळींनी प्रकाशित करून त्यात सदस्याला टॅग केलेले असते. तसेच सर्व सदस्यांची सर्व माहिती त्या संकेतस्थळांवर साठवली जाते व अनेकदा मोठमोठ्या कंपन्यांना विकली जाते. त्यामुळे गुप्तता ही सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांविषयीची मुख्य चिंता आहे.

१) प्रोफाईल- माहिती पान: जवळजवळ सर्व सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचा मूलभूत घटक म्हणजे माहिती पान होय. या पानावर त्या संकेतस्थळाच्या सदस्याची माहिती प्रकाशित केली जाते. उदा- नाव, वय, लिंग, व्यवसाय, निवास स्थान, आवडीनिवडी इत्यादी. अनेकवेळा सदस्य एखादा फोटो देखील प्रकाशित करू शकतो. ही सर्व माहिती त्या संकेतस्थळावर साठवली जाते. जर कोणी त्या सदस्यास अथवा त्याची माहिती शोधण्याचा प्रयत्न केला तर ते माहिती पान त्या व्यक्तीस दिसते. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळावर अशी प्रोफाईल बनवण्यास किमान वयाची पात्रता लागते. ही पात्रता प्रत्येक संकेतस्थळानिशी बदलते. २) ओळख- संपर्क व मैत्री: सोशल नेटवर्क सेवेचा मुख्य उद्देश इंटरनेटवर संपर्क जाळे निर्माण करणे हा आहे. त्यामुळे सर्व सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचा वापर प्रामुख्याने इतर व्यक्तींशी ओळख व मैत्री करण्यात केला जातो. हा सर्व सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचा महत्त्वाचा घटक आहे. या संपर्कजाळ्याला प्रत्येक संकेतस्थळावर विविध नावांनी ओळखले जाते. उदा- फेसबुक, ओर्कुटवर यास फ्रेंड्स- मित्र असे म्हणतात. तर ट्विटरवर त्यास फॉलोवर्स- अनुयायी असे म्हटले जाते. ३) घोषणा व संदेश: या संकेतस्थळांवर संपर्क साधण्याचे मुख्य साधन म्हणजे घोषणा असते. प्रत्येक सदस्य कोणतीही घोषणा प्रकाशित करू शकतो. यास इंग्रजीत स्टेटस मॅसेज असे म्हणतात. सदस्याने प्रकाशित केलेल्या घोषणा त्या सदस्याच्या त्या संकेतस्थळावरील सर्व मित्रमैत्रिणींना दिसतात व हे मित्रमैत्रिणी त्यावर आपली मते मांडू शकतात. त्याचप्रमाणे एकमेकांना संदेश पाठवण्याची सोय देखील येथे उपलब्ध असते. ४) संवाद: सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचा वापर संवाद साधण्यास म्हणजेच चॅट करण्यासाठी सुद्धा करतात. सोशल नेटवर्क सेवा सुरू होण्यापूर्वी देखील अशा प्रकारचे चॅटिंग इंटरनेटवर केले जात असे. ५) इतर तंत्रज्ञानाशी मेळ: या सेवेची व संकेतस्थळांची लोकप्रियता पाहता अनेक मोबाईल फोन कंपन्यांनी ही सेवा मोबाईलवरही उपलब्ध केली आहे. म्हणजेच सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांवर प्रवेश करणे संगणकापुरते मर्यादित नाही. मोबाईल फोनवरून देखील या संकेतस्थळांवर प्रवेश करता येतो. ६) ॲप्लिकेशन्स: माहिती पान व संपर्कजाळे यांखेरीज दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ॲप्लिकेशन्स होय. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळे सदस्याला विविध ॲप्लिकेशन्सही पुरवतात. त्यांचा वापर करून सदस्याला आपले माहिती पान सजवता येते. आपल्या फोटोमध्ये बदल घडवता येतात, विविध खेळ खेळता येतात. ही ॲप्लिकेशन्स प्रत्येक संकेतस्थळानुसार बदलतात. एखाद्या संकेतस्थळाच्या लोकप्रियतेवर याचा खुप मोठा प्रभाव पडतो. ७) व्यावसायिक उपयोग: अनेक व्यावसायिक कंपन्या व संघटना या संकेतस्थळांचा वापर आपल्या कंपनीविषयी माहिती पुरवण्यास करतात. विविध कंपन्या सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांवर आपले प्रोफाईल प्रकाशित करतात. ८) जाहिराती: सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांची लोकप्रियता व विस्तार पाहता अनेक व्यावसायिक कंपन्या व उद्योग धंदे या संकेतस्थळांचा वापर जाहिरातींसाठी सुद्धा करतात. उदा- इतर संकेतस्थळांच्या जाहिराती, बाजारातील नवीन वस्तूंच्या जाहिराती, नोकऱ्यांच्या जाहिराती इत्यादी. संकेतस्थळांना या जाहिरातदारांकडून प्रचंड पैसा मिळतो व त्यावरून ते नफा कमवतात.

बहुतेक वेळा अनेक लोक अशाच व्यक्तींशी ऑनलाईन मैत्री करतात, की ज्यांना ते प्रत्यक्षात ओळखतात किंवा कधी तरी भेटलेले असतात. तरीही सोशल नेटवर्किंग संकेतस्थळे प्रत्येक सदस्यास वेगवेगळ्या अनोळखी व्यक्तींशी देखील मैत्री करण्याची संधी देतात. सदस्यांचे संपर्कजाळे झळकवणे हा सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचा मुख्य गुणधर्म आहे. एखाद्या सोशल नेटवर्क सेवेचा पाया म्हणजे एखाद्या व्यक्तीने त्या सोशल नेटवर्किंग संकेतस्थळावर तयार केलेले प्रोफाईल पान अर्थात माहिती पान असते. एखाद्या व्यक्तीचा इंटरनेटवरील आविष्कार किंवा रूप किंवा अवतार म्हणजे हे प्रोफाईल पान होय. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळे व्यक्तीला अशा प्रकारचे प्रोफाईल बनवणे, त्या संकेतस्थळांवरील इतर व्यक्तींशी ओळख व मैत्री करणे तसेच विविध माहितीची देवाण-घेवाण करणे आदींची संधी देतात. सोशल नेटवर्क सेवेमुळे एकाच वेळी अनेक लोकांशी संपर्क व ओळख ठेवता येते. यात वेळ, स्थान इत्यादी गोष्टी आड येत नाहीत. मात्र या ओळखींचा प्रत्यक्ष आयुष्यात उपयोग होतो की नाही, हे सांगणे कठीण आहे. सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांवरील माहितीचा वापर अनेक कंपन्या, अर्थवित्तीय संस्था, मोबाईल सेवा पुरवणाऱ्या कंपन्या आदी करतात. अनेक वेळा या माहितीचा गैरवापरही केला जाऊ शकतो.

सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचे वाढते जाळे व लोकप्रियता तसेच लोकांवर होणारा परिणाम हे अनेक अभ्यासकांचे लक्ष वेधत आहे. पत्र व पत्रपेट्यांना केव्हाच बाद केले आहे. आता तर वर्तमानपत्रेही शेवटच्या घटका मोजू लागले आहेत. वाढत्या लोकप्रियतेबरोबरच इंटरनेट व सोशल नेटवर्किंग संकेतस्थळांचे व्यसनही वाढत आहे. अल्पवयीन मुलांसह तरुणाई खेळाच्या अत्याधिक आहारी गेली आहे. ती सर्व आईवडील किंवा प्रिय व्यक्तीलाही जुमानत नाहीत. व्यत्यय आणला म्हणून प्राणघातक हल्ले केल्याच्या प्रसंगी जीव घेतल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. काही ठिकाणी तर अशा वेड्यापिस्या मुलांनी आत्महत्यांचाही पर्याय निवडला आहे, हे येथे चिंतनीयच!

!! समाज माध्यमांचा उपयोग सामाजिक स्तर उंचावण्यासाठीच व्हावा, यास्तव सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

- संकलन व सुलेखन -
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
गडचिरोली, फक्त व्हॉट्सॲप:९४२३७१४८८३.

# श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेचा वर्धापन दिन उत्साहात



पिंपळे सौदागर, दि. १८ (प्रतिनिधी) – मिश्किल– विनोदी कविता, भक्तीगीत, जोगवा आणि पाऊस गीतांच्या सादरीकरणाने येथील श्री संत ज्ञानेश्वर ब्राह्मण संस्थेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्येष्ठ सदस्य शशिकांत कुलकर्णी, माधुरी मुलमुले आणि माधुरी कुलकर्णी यांच्या हस्ते दिपप्रज्वलन तसेच ज्ञानेश्वर माऊलींचे प्रतिमा पुजन करण्यात आले. त्यानंतर विजया तारे, आरती किणगी, रेणुका कुलकर्णी, माधुरी मुलमुले, सुरेखा कुलकर्णी, अनुराधा निलेगावकर, शशिकांत कुलकर्णी, शशांक खांडेकर, शैलजा लोकरस, विनिता देशपांडे, अनघा वडनेरकर, जयंत चौधरी, उषा भागवत, प्रमिला देशपांडे, मीनाक्षी कुलकर्णी आदिंनी कलागुण सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनुराधा निलेगावकर यांनी केले. सुत्रसंचलनाची जबाबदारी गौरी फडके आणि स्नेहा चिंचवडकर यांनी सांभाळली. अध्यक्षीय समारोप विलास जोशी यांनी केला. अनिल कुलकर्णी यांनी आभार मानले.

# स्मार्ट मीटरचा फायदा; दिवसा वीजवापरावर ४ कोटींची सवलत!

## छत्रपती संभाजीनगर परिमंडलात पावणेतीन लाख ग्राहकांना लाभ

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) – आधुनिक तंत्रज्ञानाच्या स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना विजेचा अचूक वापर कळतोय; शिवाय वापरावरही नियंत्रण ठेवता येतेय. विशेष म्हणजे घरगुती ग्राहकांना दिवसा वीजवापरावर महावितरण घसघशीत सवलतही देत आहे. छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील पावणेतीन लाख घरगुती ग्राहकांना आतापर्यंत जवळपास ४ कोटी रुपयांची सवलत मिळाली आहे. ही सवलत मिळवण्यासाठी स्मार्ट टीओडी मीटर आवश्यक आहे. ते बसवण्यासाठी ग्राहकांनी सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

राज्यात सौरऊर्जेसारख्या नवीकरणीय ऊर्जेची उपलब्धता वाढली आहे. ही वीज स्वस्त मिळत असल्याने महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार दिवसाच्या वीजवापरासाठी सवलत लागू केली आहे. घरगुती ग्राहकांना २०२५ च्या जुलै म हिन्यापासून सवलत मिळत आहे. टाईम ऑफ डे प्रणालीनुसार वीज वापराच्या कालावधीनुसार दर आकारणी केली जाते. औद्योगिकनंतर घरगुती ग्राहकांना प्रथमच स्वस्त वीज दरासाठी टीओडी (टाईम ऑफ डे) प्रमाणे आकारणी सुरू करण्यात आली. जुलै २०२५ ते मार्च २०२६ पर्यंत ८० पैसे प्रतियुनिट सवलत मिळाली. यंदा ही सवलत ८५ पैसे प्रतियुनिट असून, पुढील तीन आर्थिक वर्षात ती वाढत जाणार आहे.

छत्रपती संभाजीनगर परिमंडलात २ लाख ७२ हजार ५६९ घरगुती ग्राहकांना जुलै–२०२५ ते मे–२०२६ या ११ महिन्यांच्या वीजबिलात ३ कोटी ८१ लाख १७ हजार १२८ रुपयांची टीओडी सवलत मिळाली. छत्रपती संभाजीनगर शहर मंडलातील ७१ हजार ६८७ ग्राहकांना १ कोटी ५४ लाख २१ हजार २०९ रुपये, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण मंडलातील १ लाख ३९ हजार ४४० ग्राहकांना १ कोटी ५३ लाख ६८ हजार ४५५ रुपये तर जालना मंडलातील ६१ हजार ४४२ ग्राहकांना ७३ लाख २७ हजार ४६४ रुपये सवलत मिळाली.

नव्या तंत्रज्ञानाच्या मीटरचे रीडिंग ऑटोमॅटिक होत असल्याने अचूक बिले मिळून घरातील विजेचा वापर दर तासाला संबंधित ग्राहकांना मोबाईलवर पाहता येण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्याद्वारे ग्राहकांचे वीजवापरावरही थेट नियंत्रण राहणार आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत वीजग्राहक घरातील प्रामुख्याने वॉशिंग मशीन, ओव्हन, गिझर, एअर कंडिशनर व इतर उपकरणांचा मोठा वापर करतात. त्यात टीओडी मीटरमुळे ग्राहकांचा मोठा आर्थिक फायदा होत आहे. विशेष म्हणजे महावितरणकडून हे स्मार्ट टीओडी मीटर ग्राहकांकडे मोफत लावण्यात येत आहेत.

ग्राहकांना अचूक व वेळेत वीजबिल देण्यास उपयुक्त ठरणारे अत्याधुनिक टीओडी वीजमीटर प्री–पेड नसून, पोस्टपेड आहेत. पूर्वीप्रमाणेच वीजवापरानंतरच ग्राहकांना वीजबिले मिळणार आहेत. हे मीटर मोफत बसवण्यात येत असून, ग्राहकांना कुठलाही आर्थिक भुर्दंड बसणार नसल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. यात मानवी हस्तक्षेपाला अजिबात वाव नाही. दिवसा वीजवापराची सवलत मिळवण्यासाठी ग्राहकांनी टीओडी मीटर बसवण्यासाठी सहकार्य करावे तसेच अधिक विजेची गरज असणारी उपकरणे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत प्राधान्याने वापरून सवलतीचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# येवला येथे हिंदवी सूर्य महाराणा प्रतापसिंह यांच्या शौर्य कथाना उत्तम प्रतिसाद



वैजापूर/येवला, दि. १८ (प्रतिनिधी) – हिंदवी सूरज महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंतीचे औचित्य साधत येवला येथील सकल राजपूत–परदेशी सम ाजाच्या वतीने मथुरा–वृंदावन येथील आचार्य देवव्रत महाराज यांच्या वाणीतून संगीतमय महाराणा प्रतापसिंह यांच्या शौर्य कथांचा कार्यक्रम रविवार (ता. १४)ते मंगळवार(ता,१६)पर्यंत येवला येथील परदेशी समाज मंगल कार्यालयात सायंकाळी सात ते दहा वाजे दरम्यान ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमात येवले शहर व तालुक्यातील परदेशी–राजपूत समाजाच्या व इतर समुदायाच्या महिला व पुरुषांनी उत्तम प्रतिसाद दिला. आयोजक नगरसेवक बंटी भाऊ राजपूत, दिनेश परदेशी, धीरज परदेशी यांनी अत्यंत नियोजन बद्ध कार्यक्रम घडवून आणला.

आचार्य देवव्रत महाराजांनी महाराणा प्रतापसिंह यांच्या बालपण पूर्वी पासूनच्या व महाराणा प्रतापसिंह यांचे बालपण,व राजपद स्वीकारणे, हल्दीघाटी युद्ध,अशा विविध प्रसंगातून गीत संगीतमय कथा सादर केल्या.

या प्रसंगी वैजापूरचे एसएसएसजीमचे संचालक सोनू राजपूत,तसेच सामाजिक कार्यकर्ते धोंडीराम सिंह राजपूत, छत्रपती संभाजीनगरचे डॉ. जीवन राजपूत यांनी ही या कथाना हजेरी लावली होती.

# 'एल निनोचा इशारा! महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी आताच सावध व्हा; संकटाला संधीत बदलण्याचा मंत्र - अतुल चव्हाण'

छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) – प्रशांत म हासागरातील समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान वाढल्याने निर्माण झालेल्या 'एल निनो' परिस्थितीची अधिकृत घोषणा भारतीय हवामान विभागाने केली आहे. याचा थेट परिणाम महाराष्ट्रातील पावसाच्या स्वरूपावर होण्याची शक्यता असून खरीप हंगामातील पिकांसाठी हा सावधतेचा इशारा असल्याचे मत सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांनी व्यक्त केले आहे.

अतुल चव्हाण यांनी दिलेल्या माहितीनुसार, एल निनोच्या प्रभावामुळे पाऊस वेळेवर सुरू होऊनही मध्येच दीर्घ खंड पडू शकतो, तर काही भागांत अतिवृष्टीच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. विशेषतः महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील सोयाबीन, भुईमूग आणि कडधान्य पिकांना ऑगस्ट महिन्यात पावसाचा खंड पडल्यास मोठा फटका बसू शकतो.

याशिवाय कमी पावसामुळे मावा, तुडतुडे आणि थ्रिप्स यांसारख्या किडींचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी हंगामाच्या सुरुवातीलाच योग्य नियोजन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांसाठी अतुल चव्हाण यांचा चार सूत्री सल्ला

१) कमी कालावधीच्या जातींची निवड करा : अनिश्चित पावसाचा विचार करून कमी पाणी लागणाऱ्या व कमी कालावधीत येणाऱ्या पिकांच्या जातींची निवड करावी.

२) आंतरपीक पद्धतीचा अवलंब करा : कापूस किंवा तुरीसोबत मूग, उडीद यांसारखी आंतरपीके घेतल्यास जोखीम कमी होते आणि उत्पन्नाचा पर्याय उपलब्ध राहतो.

३) गादीवाफ्यावर पेरणी करा : अतिवृष्टी झाल्यास अतिरिक्त पाणी निचरा होतो, तर पावसाचा खंड पडल्यास ओलावा टिकून राहतो.

४) पाणी व्यवस्थापन व पीक विमा घ्या : ठिबक, तुषार सिंचन, शेततळ्यांची स्वच्छता आणि पीक विमा यावर विशेष भर द्यावा.

'एल निनो हे संकट असले तरी योग्य नियोजन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि वेळेवर घेतलेले निर्णय यामुळे त्याचे परिणाम कमी करता येऊ शकतात. तयारी असेल तर संकट लहान होते,' असे अतुल चव्हाण यांनी नमूद केले.

# हिंदवी सूर्य महाराणा प्रतापसिंह यांना जयंती निमित्त वैजापूरात सामूहिक अभिवादन



वैजापूर, दि. १८ (प्रतिनिधी) – विश्वाला स्वाभिमानाचा पाठ शिकविणारे स्वाभिमानी राजपूत व प्रखर राष्ट्रनिष्ठा उरी बाळगून भारत मातेचे रक्षक राजे महाराणा प्रतापसिंह याना तिथी नुसारच्या जयंती दिनी बुधवार (ता.१७) रोजी शहरातील सर्व थरातील राजपूत/परदेशी समुदायाच्या नागरिकांनी व सर्व थरातील नागरिकांनी एकत्र येत सकाळी दहा वाजता श्री महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्याच्या जागी महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्याला अभिवादन करून जयंती उत्सव निमित्त घोषणा देऊन जयंती साजरी केली. शहरातील तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. पुतळा स्थळ सुशोभिकरणं सध्या सुरू आहे.

# मंत्री विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप



छत्रपती संभाजीनगर, दि. १८ (प्रतिनिधी) – राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वैजापूर तालुक्यातील भगूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांना वह्या, पेन्सिल व पेन देऊन वाढदिवस साजरा करण्यात आला.

माजी सरपंच अमोल बुट्टे, माजी उपसरपंच प्रशांत चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य सदस्य कुणाल चव्हाण व ज्ञानेश्वर चव्हाण

यांच्या पुढाकाराने जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळावी तसेच शिक्षणाबाबत त्यांच्यात आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने साहित्याचे वितरण करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सदस्या शितल आल्हाट, राहुल आल्हाट, सरपंच जयश्री जनार्दन चव्हाण, जनार्दन चव्हाण, मच्छिंद्र चव्हाण, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रदीप जाधव, उपाध्यक्ष सुरेश बुट्टे, दादाभाऊ शेजवळ, पोपट बुट्टे, मुख्याध्यापक सोनवणे सर, शिक्षकवृंद तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमास ग्रामस्थ व पालकांचा उत्स्फ ूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनीही मिळालेल्या साहित्याबद्दल आनंद व्यक्त केला.

**विद्यार्थ्यांना पटवून दिले शिक्षणाचे महत्त्व!**

दरम्यान कार्यक्रमात मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित अभ्यास, शिस्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत मिळाल्यास त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# आ.जगताप यांच्या जनसंवाद कार्यक्रमात नागरिकांनी वाचला समस्यांचा पाढा



पुणे, दि. १७ (प्रतिनिधी ) – परिसरातील सोसायट्यांमध्ये होणारा अपुरा पाणीपुरवठा, स्वच्छता गृहाची वाणवा, उद्यानातील गैरप्रकार, फुटपाथवरील अतिक्रमणे, दारुच्या दुकानाचे स्थलांतर , रस्तेबांधणी , वाहतुक समस्या, विरंगुळा केंद्राची उभारणी या आणि इतर समस्यांचा पाढा पिंपळे सौदागर येथील रहिवाश्यांनी आ. शंकर जगताप यांच्यासमोर वाचला. निवडणुकीनंतर नागरिकांशी संवाद साधण्यासाठी त्यांच्या अडचणी समजावून घेण्यासाठी पहिल्यांदाच आ. शंकर जगताप यांच्या जनसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

बुधवार दि. १७ रोजी उन्नती सोशल फाउंडेशनच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमात आ. शंकर जगताप यांच्यासह पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रृघ्न बापू काटे, मंडल अध्यक्ष सोमनाथ तापकिर, प्रभागाच्या नगरसेविका डॉ. कुंदा भिसे, अनिता काटे, अर्चना तापकिर, सविता खुळे, तानाजी बारणे, कुणाल वादळ, मनीषा पवार , तंतरपाळे, आदी उपस्थित होते. यावेळी रविंद्र पाटील, संतोष वर्तक, सुभाष विधाते, डॉ. रश्मी मोरे, अशोक कलाल, रमेश वाणी, सुनील बन्सल, वाल्मिक काटे, परमेश्वर झोपे, डॉ. सुभाषचंद्र पवार, रेश्मा, अहिल्या साळी या नागरिकांनी प्रभागातील समस्या आमदारांच्या कानी घातल्या. त्यावर नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या जाणून घेण्यासाठीच जनसंवादाचा उपक्रम हाती घेतला असून त्या सम स्यांचे निराकरण करण्याचा निश्चितच प्रयत्न केला जाईल असे आश्वासन आ. जगताप यांनी यावेळी दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शत्रुघ्न काटे यांनी केले तर सोमनाथ तापकिर यांनी आभार मानले.

# प्रसिध्द संगीतकारचा 'त्या' पोस्टने चाहत्यांमध्ये खळबळ; निवृत्तीची चर्चा रंगली

मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी) – बॉलिवूडचे प्रसिद्ध संगीतकार प्रीतम चक्रवर्ती यांनी १४ जून रोजी वाढदिवसानिमित्त सोशल मीडियावर केलेल्या एका भावनिक पोस्टमुळे चाहत्यांमध्ये त्यांच्या निवृत्तीबाबत चर्चा सुरू झाली आहे. गेली दोन दशके हिंदी चित्रपटसृष्टीला एकापेक्षा एक सुपरहिट गाणी देणाऱ्या प्रीतम यांच्या पोस्टने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

वाढदिवसानिमित्त शेअर केलेल्या पोस्टमध्ये प्रीतम यांनी लिहिले की, 'सर्व शुभेच्छांसाठी धन्यवाद. प्रत्येकाला वैयक्तिकरित्या उत्तर देणे शक्य नसले तरी माझे मनःपूर्वक आभार स्वीकारा. आज मी स्वतःला काही वर्षे वेगळ्या पद्धतीने जगण्याची भेट देत आहे. आयुष्यात जे काही राहून गेले, ते पुन्हा अनुभवण्याची वेळ आली आहे. आता एका नव्या प्रवासाला सुरुवात करण्याची वेळ आली आहे, जो अनेक वर्षांपासून प्रलंबित होता.'

पुढे त्यांनी म्हटले की, 'मेनस्ट्रीम हा एक सुंदर प्रवास होता. मात्र, मला नेहमीच न शोधलेल्या वाटांविषयी अधिक उत्सुकता वाटत आली आहे. तुमच्या प्रेम आणि पाठिंब्यासाठी मनापासून धन्यवाद.' या पोस्टनंतर सोशल मीडियावर प्रीतम यांच्या निवृत्तीच्या चर्चांना उधाण आले आहे. मात्र त्यांनी संगीत क्षेत्रातून निवृत्ती घेत असल्याचे कुठेही स्पष्टपणे नमूद केलेले नाही. त्यामुळे ही पोस्ट नव्या आयुष्याच्या टप्प्याची किंवा वेगळ्या सर्जनशील प्रवासाची सुरुवात असल्याचीही शक्यता व्यक्त केली जात आहे.

# 'बंटवारा १९४७'मधील पात्रांचा झाला खुलासाः विस्कटलेल्या काळात धैर्य आणि मानवतेचे प्रतीक ठरले हे चेहरे

'बंटवारा १९४७'मधील पात्रांचा झाला खुलासाः विस्कटलेल्या काळात धैर्य आणि मानवतेचे प्रतीक ठरले हे चेहरेदमदार आणि भावनिक मोशन पोस्टरनंतर आता बंटवारा १९४७च्या निर्मात्यांनी चित्रपटातील पात्रांचे पोस्टर्स प्रदर्शित केले आहेत, जे ताकद, निरागसता आणि अटळ जिद्दीचे दर्शन घडवतात. आमिर खान प्रोडक्शन्सच्या बॅनरखाली बनलेल्या या चित्रपटात मातृभूमीप्रती असलेले धैर्य आणि दृढनिश्चय यांची कथा मांडण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. चित्रपटाविषयीची उत्सुकता वाढत असताना, निर्मात्यांनी त्या पात्रांचा परिचय करून दिला आहे, जे त्यांच्या आजूबाजूचे जग कोसळत असतानाही धैर्य आणि आशेचे प्रतीक बनून उभे राहिले.




चित्रपटाच्या विश्वाची अधिक जवळून ओळख करून देत बंटवारा १९४७मधील पात्रांचे पोस्टर्स समोर आले आहेत. यामध्ये शबाना आझमी दुर्गावती देवी (माई) यांच्या भूमिकेत, सनी देओल सिकंदर मिर्झा यांच्या भूमिकेत, प्रीती जी. झिंटा हम ीदा बेगम यांच्या भूमिकेत, करण देओल जावेद मिर्झा यांच्या भूमिकेत, अली फझल हबीब अन्वर यांच्या भूमिकेत आणि अभिमन्यू सिंह याकूब खान यांच्या भूमिकेत दिसत आहेत. हे पोस्टर्स त्या लोकांची कहाणी सांगतात, ज्यांनी फाळणीच्या कठीण काळातही हार म ानली नाही आणि आपल्या धैर्य व संयमाने एक आदर्श निर्माण केला.

निर्मात्यांनी प्रदर्शित केलेले किशनचे पोस्टर विशेषतः अत्यंत आकर्षक आणि प्रभावी वाटते. हे दर्शवते की चित्रपटाची ताकद केवळ त्याच्या पात्रांम ध्येच नाही, तर त्याच्या समर्पणात आणि भावनिक आत्म्यातही दडलेली आहे. प्रत्येक चेहरा आपल्या भावभावना आणि उपस्थितीद्वारे बरेच काही सांगतो, ज्यामुळे ही रंजक कथा मोठ्या पडद्यावर पाहण्याची उत्सुकता आणखी वाढली आहे.

राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक राजकुमार संतोषी दिग्दर्शित बंटवारा १९४७ हा चित्रपट जवळपास तीन दशकांनंतर राजकुमार संतोषी आणि सनी देओल यांच्या बहुप्रतीक्षित पुनरागमनाचाही साक्षीदार ठरणार आहे. आमिर खान प्रोडक्शन्सच्या बॅनरखाली बनलेल्या बंटवारा १९४७चे दिग्दर्शन राजकुमार संतोषी यांनी केले आहे. चित्रपटाचे संगीत ए. आर. रहमान यांनी दिले असून गीतलेखन जावेद अख्तर यांनी केले आहे. चित्रपटाची निर्मिती आमिर खान आणि अपर्णा पुरोहित यांनी केली आहे. हा चित्रपट १४ ऑगस्ट २०२६ रोजी जगभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

# १ ऑगस्टपासून महिला, ज्येष्ठ व अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी 'स्मार्ट कार्ड' अनिवार्य; एसटी प्रवासासाठी नवा नियम लागू

मुंबई, दि. १८ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवासी सेवांमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी तसेच डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. १ ऑगस्ट २०२६ पासून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिक या प्रवर्गातील प्रवाशांसाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

या निर्णयानंतर राज्यभर स्मार्ट कार्ड नोंदणी आणि वितरण मोहिमेला गती मिळाली आहे. उपलब्ध माहितीनुसार, आतापर्यंत सुमारे ५१ लाख नागरिकांनी एनसीएमसी स्मार्ट कार्डसाठी नोंदणी केली असून त्यापैकी जवळपास २५ लाख कार्डे कार्यान्वित करण्यात आली आहेत. उर्वरित नोंदणीकृत लाभार्थ्यांची कार्डेही लवकरच सुरू करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि अमृत ज्येष्ठ नागरिकांनी कोणताही विलंब न करता आपले स्मार्ट कार्ड प्राप्त करून ते सक्रिय करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. १ ऑगस्टपासून लागू होणाऱ्या या व्यवस्थेनंतर संबंधित प्रवाशांना एसटीच्या विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी एनसीएम सी स्मार्ट कार्ड आवश्यक ठरणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी नोंदणी व कार्ड सक्रिय करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन परिवहन विभागाकडून करण्यात आले आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# औरंगाबाद-जालना विधानपरिषद निवडणूक: मतदान केंद्रावर व्हीलचेअर नसल्याने गोंधळ, भाजपाच्या नगरसेविकेला उचलून नेण्याची नामुष्की





छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- औरंगाबाद-जालना विधान परिषद मतदार संघासाठी आज १३ मतदान केंद्रावर मतदान पार पडले. शहरातील तहसील कार्यालयात सुरू झालेल्या मतदान केंद्रावर आज नियोजनशून्य कारभार पाहायला मिळाला. या निवडणुकीत आज एकुण ९८.९० टक्के मतदान झाले. भाजपाच्या नगरसेविका सत्यभामा शिंदे या आजारी असताना आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी केंद्रावर आल्या. त्यांना चालता येत नसल्याने मतदान केंद्रापर्यंत जाण्यासाठी व्हील चेअरची मागणी करण्यात आली. मात्र तिथे व्हील चेअरची व्यवस्था नसल्याचे त्यांना सांगण्यात आले. त्यावेळी भाजपाचे नगरसेवक प्रमोद राठोड आणि इतर सदस्यांनी त्यांना खुर्चीवर उचलून मतदान केंद्रात आणले. मतदारांसाठी व्हीलचेअरची व्यवस्था नसल्याचा आरोप करत उपस्थित सदस्यांनी संताप व्यक्त केला. आजारी नगरसेविकेला मतदानासाठी अडचणींचा सामना करावा लागल्याने मतदान केंद्रावरील व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. दरम्यान, या प्रकारानंतर भाजप नगरसेवक प्रमोद राठोड यांनी मतदान अधिकाऱ्यांना जाब विचारला.

निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार कुणी आजारी आहे का, मदतीची गरज आहे का, याबाबत लेखी विचारणा करण्यात आली होती. तेव्हा प्रत्येक पक्षाने याबाबत माहिती देणे आवश्यक होते. मात्र माहिती निरंक आली. तरीही मतदान केंद्रवर व्हील चेअर सह रुग्णवाहिका हजर होती. कर्मचारी मतदान केंद्रात असल्याने थोडा वेळ लागला व्हील चेअर काढण्यासाठी अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी सविता चौधर यांनी दिली.

तहसील कार्यालयासमोर मंत्री अतुल सावे व शिंदे सेनेचे नेते जम बसवू बसले होते. त्यांनी आमच्या प्रतिनिधीला प्रतिक्रिया देताना सांगितले महायुतीचे उमेदवार सुहास शिरसाट हे शंभर टक्के विजयी होणार आहे. सकाळी ८ वाजता भाजपा, शिंदे सेना व राष्ट्रवादी अजित पवार गटाचे मतदारांनी मतदान केले. आमच्याकडे ३३७ मतांचा आकडा होता म्हणून घोडेबाजार करण्याची गरज पडली नाही. आमच्या उमेदवाराला ४५० च्या आसपास मते मिळतील असा दावा त्यांनी केला आहे.

एमआयएमचे विरोधीपक्षनेते समीर साजिद बिल्डर यांनी दावा केला आहे आम्ही भाजपाला फाईट दिली. आमच्याकडे जेवढी मते होती त्याहून जास्त मते आम्हाला मिळतील. आम्ही सर्वात मोठे विरोधीपक्ष आहे. आम्हीच भाजपाचा मुकाबला करु शकतो हे या निवडणुकीत दाखवून दिले आहे.

महाविकास आघाडी व एमआयएम सोबत आले असते तर या निवडणुकीत चित्र वेगळे दिसले असते या प्रश्नाच्या उत्तरात समीर म्हणाले महाविकास आघाडीने प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांच्याशी चर्चा करायला हवी होती. माध्यमांसमोर येऊन पाठींबा मागितला असता तर वरिष्ठ नेत्यांनी निर्णय घेतला असता असे ते म्हणाले.

महाविकास आघाडीचे शरदचंद्र पवार पक्षाचे नगरसेवक नवीन सिंग ओबेरॉय यांनी सांगितले महाविकास आघाडीने हि निवडणूक बिनविरोध निवडणूक होऊ दिली नाही. मैदानात उतरुन महायुतीचा मुकाबला केला. देशात काय परिस्थिती आहे सर्वांना माहीत आहे. लोकप्रतिनिधी विकले जात आहे अशा परिस्थितीत महाविकास आघाडीने एकजूट दाखवून मतदान केले. राजकीय समीकरण बदलली तर चमत्कार होऊ शकतो.

Truhome FINANCE

## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;
**दूरध्वनीः** १८०० १०२ ४३४५, **वेबसाइटः** http://www.truhomefinance.in
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;

**परिशिष्ट-४-ए** [नियम ८(६) ची तरतूद पहा] **स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल अॅसेट्स अँण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट अॅक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)कडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली तक्त्यात दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दि २०.०७.२०२६.. रोजी स.११:०० ते दु १२:००** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे: :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव | मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख | राखीव किंमत (रु.) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह) |
|---|---|---|---|---|
| **१. श्री. रामेश्वर गोविंदराव खांडेभराव (कर्जदार)<br>२. श्रीमती रेखा अरुण काळे (सह-कर्जदार)<br>३. मे. कमल कन्स्ट्रक्शन अँड बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स (सह-कर्जदार)<br>सर्वांचा निवासी पत्ता :घर क्र. ३-१६-१११६, नारिमन नगर, लँड हॉटेलजवळ, रेल्वे स्टेशन परिसर, जालना हो., जालना, महाराष्ट्र – ४३१२०३.<br>तसेच येथे :प्लॉट क्र. ५२-ब, सी.टी.एस. क्र. १११११६ A/4, नारिमन नगर, लँड हॉटेलजवळ, रेल्वे स्टेशन परिसर, जालना हो., जालना, महाराष्ट्र – ४३१२०३.<br>कर्ज खाते क्र. : SLPHAURD0001217.**<br>**ताबा दिनांक व ताबा प्रकार**<br>**२७ मे २०२६ व प्रतीकात्मक ताबा.**<br>**ज्ञात अधिभार** ज्ञात नाही | मागणी नोटीस तारीख : ११/०२/२०२६. कर्ज खाते क्र. SLPHAURD0001217 अंतर्गत दिनांक ०९-०२-२०२६ रोजी रु. २४,१५,६६०/- (फक्त चोवीस लाख पंधरा हजार सहाशे साठ रुपये). सदर नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत करारातील दराने लागू होणाऱ्या पुढील व्याजासह. | रु. ७८,७९,६००/- (फक्त अठ्ठ्याहत्तर लाख एकोणऐंशी हजार सहाशे रुपये).<br>**बोली वाढविणे :** रु. १०,०००./- आणि त्यापटीने<br>**बयाणा ठेव रक्कम (ईएमडी) (रुपयात)**<br>रु. ७,८७,९६०/- (फक्त सात लाख सत्त्याऐंशी हजार नऊशे साठ रुपये).<br>**ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : १८ जुलै, २०२६. वेळ सकाळी १० ते सायं ५.००** | **२७ - जुलै- २०२६.<br>वेळ. सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत.** | **देबज्योती रॉय ९८७४७०२०२१<br>सतीश बनसोड ९७३००४७५७२<br>मयुरेश जाधव ९८३३०१७२२१<br>अजय झांझोट ९८२३३९०९९०<br>पाहणीची तारीख : १८.०७.२०२६<br>वेळ : दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत.** |

**संपत्तीचे विवरण**

सर्व हक्क व हितसंबंधांसह असलेला प्लॉट क्र. ५१-ब, क्षेत्रफळ ११८.३० चौ. मीटर, सी.टी.एस. क्र. १११११६/A4, सर्व्हे क्र. ३५०/१ मधील, मौजे जालना, ता. व जि. जालना येथे स्थित असलेली मालमत्ता.
चतु:सीमा : पूर्वेस : प्लॉट क्र.५२ पश्चिमेस : ९ मीटर अंतर्गत रस्ता दक्षिणेस : ९ मीटर अंतर्गत रस्ता उत्तरेस : प्लॉट क्र.५१ (भाग).

**०१. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.**
**०२. इच्छुक बोलीदारांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात बँकेचे नाव- अॅक्सिस बँक लिमिटेड शाखाः वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई बँक खाते क्रमांक-चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३ आयएफएससी कोड- यूटीआयबी ०००२३० येथे जमा करावी:**

ठिकाण - औरंगाबाद.
दिनांक - १९.०६.२०२६.

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

## महानगरपालिकेच्या शाळांमधून सीबीएससी पॅटर्न जुनिअर केजीसाठी २२ जून पासून फॉर्म वाटप

छत्रपती संभाजीनगर दि.१८ (प्रतिनिधी)- महानगरपालिकेच्या सहा शाळांमध्ये सध्या सीबीएसई पॅटर्न चे वर्ग चालविण्यात येतात. या शाळांमध्ये ज्युनिअर केजी सन २०२६- २७ च्या प्रवेशासाठी मा.आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार व उप आयुक्त अंकुश पांढरे व शिक्षण अधिकारी भारत तीनगोटे, प्रशासन अधिकारी संजीव सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवार दिनांक २२/ ६ /२०२६ ते २४/०६ २०२६ या काळात सकाळी १० ते १ या काळात प्रवेश फॉर्मचे वाटप होणार आहे.

शाळेची नावे

मनपा शाळा उस्मानपुरा

मनपा शाळा प्रियदर्शन इंदिरानगर

मनपा शाळा गारखेडा (जवाहर कॉलनी)

मनपा शाळा चेलीपुरा

मनपा शाळा एन -७

मनपा शाळा एन -११

या ठिकाणी ज्युनिअर केजी प्रवेशाचे फॉर्म उपलब्ध असतील. तरी संबंधितांनी या शाळांमधून फॉर्म हस्तगत करावे असे आवाहन सीबीएसई समन्वयक शशिकांत उबाळे यांनी केले आहे.

## देशातील सोन्याची आयात ७० टक्क्यांनी घटली!

नवी दिल्ली दि.१८ (वृत्तसंस्था)- केंद्र सरकारने सोन्यावरील सीमाशुल्कात दुप्पट वाढ केल्यानंतर देशांतर्गत बाजारात त्याचे थेट परिणाम दिसू लागले आहेत. सरकारने आयात शुल्क ६ टक्क्यांवरून थेट १५ टक्के केल्यामुळे, सोन्याची आयात तब्बल ७० टक्क्यांनी घटून २५ ते ३० टनांपर्यंत खाली आली आहे, अशी माहिती वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे. यापूर्वी देशात दरमहा सरासरी ७५ ते १०० टन सोन्याची आयात केली जात होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोने-चांदी आयात रोखण्यासाठी आणि अनावश्यक खर्च टाळण्यासाठी सोने खरेदी मर्यादित ठेवण्याचे आवाहन केले होते. त्यांनतर १३ मे पासून सोने आणि चांदीवरील आयात शुल्क ६ टक्क्यांवरून वाढवून १५ टक्के करण्यात आले. शुल्कवाढीनंतर अल्पावधीतच त्याचा परिणाम दिसून आला असून आयातीचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटले आहे.

Truhome FINANCE

## ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

**मागणी सूचना**

**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;
**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१; **वेबसाइटः** http://www.truhomefinance.in

ज्या अर्थी खाली नमूद कर्जदार यांनी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)** कडून कर्ज स्वरूपात रोख रक्कम घेतली आहे, त्याअर्थी **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड** चे असे म्हणणे आहे की , हे आर्थिक कर्ज घेतल्यानंतर कर्जदार हे कर्जापोटी घेतलेली रक्कम आणि त्यावरील व्याज यांची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत . म्हणून ह्या खात्याचे वर्गीकरण एनपीएमध्ये वर्गीकृत केले गेले. त्या अनुषंगाने सुरक्षा आणि वित्तीय मालमत्ता पुनर्रचना व सुरक्षा व्याज अधिनियम -२००२ (सरफेसी कायदा)अन्वये आणि कलम-१३ (२) नुसार कर्जदारांच्या अंतिम पत्यावर मागणी सूचना जारी केल्या आहेत. या सुचने व्यतिरिक्त, त्यांना या जाहीर सूचनेद्वारे माहिती देण्यात येत आहे.
कलम १३(२) अनुसार पाठविलेल्या मागणी सूचनेत कर्जदार , सुरक्षित मालमत्ता व त्या अंतर्गत दावा केलेल्या थकीत रकमेचा तपशील दिलेला आहे.

| कर्जदाराचे नाव / सह-कर्जदारांचे नाव व पत्ता | प्रतिभूत मालमत्तेचा पत्ता | मागणी सूचना तारीख आणि देय रक्कम रु. |
|---|---|---|
| **कर्ज खाते क्र. : THLHAURD0001575<br>१. श्री. गिरीश सोनाजीपंत देशपांडे (कर्जदार)<br>२. श्रीमती अपर्णा गिरीश देशपांडे (सह-कर्जदार)<br>सध्याचा पत्ता :एन-९, एम-२, १३९/१, ज्ञानेश्वर नगर, सिडको, औरंगाबाद, महाराष्ट्र – ४३१००१.<br>तसेच येथे :घर क्र. K-57A/122, पवन नगर, सिडको, एन-९, औरंगाबाद, महाराष्ट्र – ४३१००१.<br>तसेच येथे :लोटस कॉर्पोरेट पार्क, बी विंग, कार्यालय क्र. ३०१ व ३०२, गोरेगाव (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००६३.<br>तसेच येथे :प्लॉट क्र. १३, सर्व्हे क्र. ३७, भोलेश्वर नगर, मौजे कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३<br>कर्ज रक्कम : रु. १७,८०,९२२/-.<br>एन.पी.ए. दिनांक : ०५/०५/२०२६.** | सर्व हक्क व हितसंबंधांसह असलेला प्लॉट क्र. १३, क्षेत्रफळ ७४.३७ चौ. मीटर, सर्व्हे क्र. ३७, भोलेश्वर नगर, मौजे कन्नड, जि. औरंगाबाद येथे स्थित असलेली मालमत्ता.<br>चतु:सीमा : पूर्वेस : प्लॉट क्र. १८<br>पश्चिमेस : रस्ता<br>दक्षिणेस : प्लॉट क्र. १४<br>उत्तरेस : प्लॉट क्र. १३ (भाग) – किसनराव भिकाजी अंदोरे यांची मालमत्ता. | मागणी सूचना दिनांक - १०-०६-२०२६<br>मागणी सूचना रक्कम - रु. १८,४२,९४१/- (फक्त अठरा लाख बेचाळीस हजार नऊशे एक्केचाळीस रुपये)<br>दिनांक ०९-०६-२०२६ रोजी कर्ज खाते क्र. THLHAURD0001575 अंतर्गत, यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज तसेच आनुषंगिक खर्च, खर्च इत्यादीसह. |
| **कर्ज खाते क्र. : TBTHAURD0001407 व TTUHAURD0001429१. श्री. मेघा सतीश बंकर (कर्जदार)<br>२. श्री. सतीश कैलास बंकर (सह-कर्जदार)<br>सध्याचा पत्ता :रो हाऊस क्र. ११३, सारा सह्याद्री पार्क, वैजापूर एम.सी.एल., वैजापूर, शिर्डी रोड, औरंगाबाद, महाराष्ट्र – ४२३७०१.<br>तसेच येथे :नागपूर-मुंबई हायवे, माकरमपूर, औरंगाबाद, महाराष्ट्र – ४२३७०३.<br>तसेच येथे :लाडगाव रोड, वैजापूर एम.सी.एल., वैजापूर, पाण्याच्या टाकीजवळ, औरंगाबाद, महाराष्ट्र – ४२३७०१.<br>कर्ज रक्कम :रु. १५,१४,१३७/-<br>कर्ज खाते क्र. : TBTHAURD0001407<br>रु. ४,१३,५६२/-<br>कर्ज खाते क्र. : TTUHAURD0001429<br>एन.पी.ए. दिनांक : ०३/०६/२०२६.** | सर्व हक्क व हितसंबंधांसह असलेली रो हाऊस क्र. ११३, क्षेत्रफळ ५६.२१ चौ. मीटर, प्लॉट क्षेत्रफळ ६४.०५ चौ. मीटर व ६२.०० चौ. मीटर अविभाजित हिस्सा, गट क्र. १९७/१ मधील "सारा सह्याद्री पार्क", मौजे वैजापूर, जि. छ. संभाजीनगर येथे स्थित असलेली मालमत्ता.चतु:सीमा :<br>पूर्वेस : ९ मीटर रस्ता<br>पश्चिमेस : रो हाऊस क्र. ८८<br>दक्षिणेस : रो हाऊस क्र. ११४ | मागणी सूचना दिनांक - १०-०६-२०२६<br>मागणी सूचना रक्कम - रु. १५,६१,८००.६६/- (फक्त पंधरा लाख एकसष्ट हजार आठशे रुपये आणि सहासष्ट पैसे) कर्ज खाते क्र. TBTHAURD0001407 अंतर्गत व रु. ४,४०,८४४.८०/- (फक्त चार लाख चाळीस हजार आठशे चव्वेचाळीस रुपये आणि ऐंशी पैसे) , कर्ज खाते क्र. TBTHAURD0001407 अंतर्गत दिनांक ०९-०६-२०२६ रोजी, यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज तसेच आनुषंगिक खर्च, खर्च इत्यादीसह. |
| **कर्ज खाते क्र. : SHLHARGB0000132<br>१. श्री. राजक महाताब शेख (कर्जदार)<br>२. श्रीमती शैलासाबी राजक शेख (सह-कर्जदार)<br>सध्याचा पत्ता :सी/ओ. पंचफुलाबाई शेषराव हाके, रेणुका देवी कमानजवळ, अहमदपूर रोड, राणी सावर्गाव, ता. गंगाखेड, जि. परभणी, महाराष्ट्र – ४३१४१५.<br>तसेच येथे : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यालय, सातारा रोड, राणी सावर्गाव, ता. गंगाखेड, जि. परभणी – ४३१४१५.<br>तसेच येथे :प्लॉट क्र. १९ व २३, घर क्र. १८२९, राणी सावर्गाव, ता. गंगाखेड, जि. परभणी – ४३१४१५.<br>कर्ज रक्कम : रु. १४,९२,५०५/-<br>कर्ज खाते क्र. : SHLHARGB0000132<br>एन.पी.ए. दिनांक : ०५/०५/२०२६.** | सर्व हक्क व हितसंबंधांसह असलेली घर क्र. १८२९, प्लॉट क्षेत्रफळ पूर्व-पश्चिम लांबी ४५ फूट व उत्तर-दक्षिण रुंदी २९ फूट, एकूण क्षेत्रफळ १३०५ चौ. फूट, तसेच आर.सी.सी. बांधकाम असलेले ६ खोल्यांचे बांधकाम क्षेत्रफळ ९७३.७८ चौ. फूट, राणी सावर्गाव, ता. गंगाखेड, जि. परभणी येथे स्थित असलेली मालमत्ता.चतु:सीमा :पूर्वेस : ६ मीटर रस्ता व श्री. कदम यांचे घर<br>पश्चिमेस : ९ मीटर जुना गंगाखेड रोड<br>दक्षिणेस : माधव स्वामी यांचे घर<br>उत्तरेस : ६ मीटर रस्ता व कसबे यांचे घर. | मागणी सूचना दिनांक - १०-०६-२०२६<br>मागणी सूचना रक्कम - रु. ५,८३,५४६.५२/- (फक्त पाच लाख त्र्याऐंशी हजार पाचशे सेहेचाळीस रुपये आणि बावन्न पैसे)<br>दिनांक ११-०५-२०२६ रोजी कर्ज खाते क्र. SHLHARGB0000132 अंतर्गत, यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज तसेच आनुषंगिक खर्च, खर्च इत्यादीसह. |
| **कर्ज खाते क्र. : SLPHAURD0000085<br>१. श्री. रामदास मन्नूलाल परदेशी (कर्जदार)<br>२. श्रीमती मिनाक्षी अर्जुनसिंग परदेशी (सह-कर्जदार)<br>३. श्री. रत्नेश रामदास परदेशी (सह-कर्जदार)<br>४. श्रीमती राजकुमारी रामदास परदेशी (कायदेशीर वारस)<br>सध्याचा पत्ता :टेनेमेंट क्र. A-116/M2/2-1 व 2-1A, एन-९, ५ वी योजना, सिडको, औरंगाबाद – ४३१००१.<br>तसेच येथे :मे. श्रीनिवास अॅग्रो इंडस्ट्रीज, प्लॉट क्र. १, रिंग रोड, झाल्टा गाव, ता. व जि. औरंगाबाद – ४३११११२.<br>कर्ज रक्कम : रु. २९,२०,००७/-<br>कर्ज खाते क्र. : SLPHAURD0000085<br>एन.पी.ए. दिनांक : ०५/०५/२०२६.** | सर्व हक्क व हितसंबंधांसह असलेली टेनेमेंट क्र. A-116/M-2/2-1 व 2-1A, एन-९, ५ वी योजना, सिडको, औरंगाबाद – ४३१००१ येथील मालमत्ता.चतु:सीमा :<br>पूर्वेस : एन-९/एम/२/०२<br>पश्चिमेस : सर्व्हिस लेन<br>दक्षिणेस : ३.५० मीटर रुंदीचा पॅसेज<br>उत्तरेस : टेनेमेंट क्र. ०२/०१A व ०२/०२A. | मागणी सूचना दिनांक - १०-०६-२०२६<br>मागणी सूचना रक्कम - रु. ३९,३८,४५५.१४/- (फक्त एकोणचाळीस लाख अडतीस हजार चारशे पंचावन्न रुपये आणि चौदा पैसे)<br>दिनांक २६-०५-२०२६ रोजी कर्ज खाते क्र. SLPHAURD0000085 अंतर्गत, यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज तसेच आनुषंगिक खर्च, खर्च इत्यादीसह. |
| **कर्ज खाते क्र. : SLPHAURD0000943<br>१. श्री. सचिन सोपान झांबरे (कर्जदार)<br>२. श्रीमती सुप्रिया सचिन झांबरे (सह-कर्जदार)<br>३. मे. रुद्रा लॉजिस्टिक्स (सह-कर्जदार)<br>सध्याचा पत्ता :ग्रोथ सेंटर, प्लॉट क्र. ४०४, सिडको, सिडको वालुज कार्यालयाजवळ, बजाज नगर, गंगापूर, औरंगाबाद, महाराष्ट्र – ४३१११३६.<br>तसेच येथे :ऑफिस क्र. १३, मंजीत प्राईड, ब्लॉक ०१, करोडी, सिडको महानगर, औरंगाबाद, महाराष्ट्र – ४३१११३६<br>.तसेच मालमत्ता पत्ता :रो हाऊस क्र. A, प्लॉट, क्षेत्रफळ ७५.०० चौ. मीटर, तळमजला क्षेत्रफळ ४४.३५५ चौ. मीटर, प्लॉट क्र. १७, क्षेत्रफळ १५०.०० चौ. मीटर, सर्व्हे क्र. ४६२, सी.टी.एस. क्र. १५८७५, जालना – ४३१२०३.<br>कर्ज रक्कम : रु. ३६,७९,३२५/-<br>कर्ज खाते क्र. : SLPHAURD0000943<br>एन.पी.ए. दिनांक : ०३/०६/२०२६.** | सर्व हक्क व हितसंबंधांसह असलेली प्लॉट क्र. ४०४, क्षेत्रफळ १२१.५० चौ. मीटर, सर्व्हे क्र. १७१/भाग, मौजे तिसगाव, ग्रोथ सेंटर-१, सिडको वालुज महानगर, ता. व जि. औरंगाबाद येथे स्थित असलेली मालमत्ता.<br>चतु:सीमा :पूर्वेस : ७ मीटर रस्ता<br>पश्चिमेस : प्लॉट क्र. ४१७<br>दक्षिणेस : प्लॉट क्र. ४०३<br>उत्तरेस : प्लॉट क्र. ४०५. | मागणी सूचना दिनांक - १०-०६-२०२६<br>मागणी सूचना रक्कम - रु. ४०,११,२९८.६४/- (फक्त चाळीस लाख अकरा हजार दोनशे अठ्ठ्याण्णव रुपये आणि चौसष्ट पैसे)<br>दिनांक ०९-०६-२०२६ रोजी कर्ज खाते क्र. SLPHAURD0000943 अंतर्गत, यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज तसेच आनुषंगिक खर्च, खर्च इत्यादीसह. |
| **कर्ज खाते क्र. : SLPHAURD0001028<br>१. श्री. संतोष रुस्तुम पोखरकर (कर्जदार)<br>२. श्रीमती कालिंदा संतोष पोखरकर (सह-कर्जदार)<br>३. मे. रुद्रा लॉजिस्टिक्स (सह-कर्जदार)<br>सध्याचा पत्ता :घर क्र. ३, मोरया रेसिडेन्स, अंबड, जालना, एच.पी. पेट्रोल पंपजवळ, अंबड, महाराष्ट्र – ४३१२०४.<br>तसेच येथे :अथर्व अॅग्रो मल्टी सर्व्हिसेस, अंबड-जालना-बीड रोड, अंबड – ४३१२०४.<br>कर्ज रक्कम : रु. ९,७१,५७०/-<br>कर्ज खाते क्र. : SLPHAURD0001028<br>एन.पी.ए. दिनांक : ०३/०६/२०२६.** | सर्व हक्क व हितसंबंधांसह असलेली सर्व्हे क्र. ४५४/१, प्लॉट क्र. ९, रो हाऊस क्र. ३, सिटी सर्व्हे क्र. २२७०, एन.पी. घर क्र. १८-१३५-९, कसबे अंबड, ता. अंबड, जि. जालना – ४३१२०४ येथील मालमत्ता.<br>चतु:सीमा :पूर्वेस : ब्राम्हणे यांचे घर, रो हाऊस क्र. २पश्चिमेस : सचिन देविदास देशपांडे यांचे घर, रो हाऊस क्र. ४<br>दक्षिणेस : विक्रेत्यांचा उर्वरित भाग (मोकळा प्लॉट)<br>उत्तरेस : ४० फूट रुंदीचा रस्ता. | मागणी सूचना दिनांक - १०-०६-२०२६<br>मागणी सूचना रक्कम - रु. १०,७२,९४६.९४/- (फक्त दहा लाख बहात्तर हजार नऊशे शेहेचाळीस रुपये आणि चौऱ्याण्णव पैसे)<br>दिनांक ०९-०६-२०२६ रोजी कर्ज खाते क्र. SLPHAURD0001028 अंतर्गत, यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे पुढील व्याज तसेच आनुषंगिक खर्च, खर्च इत्यादीसह. |

उपरोक्त डिमांड नोटीसच्या अनुषंगाने कर्जदारांना कळविण्यात येते कि, हि नोटीस जारी झाल्यापासून ६० दिवसांच्या आत एकूण कर्ज आणि त्यावरील व्याज याचा भरणा करावा. जर कर्जदारांनी वरील रक्कम परतफेड केली नाही तर स्वाक्षरीकर्ता अधिकारी सरफेसी कायद्यानुसार सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेण्यावर इतर कायदेशीर पावले उचलेल. कलम -१३ (१३) नुसार सादर वर्णित मालमत्ता नोटीसमध्ये नमूद असणाऱ्या कर्जदार यांना या मालमत्तेची विक्री , भाड्याने देणे किंवा अन्य कुठलाही व्यवहार करता येणार नाही, याची नोंद घ्यावी .

ठिकाण - औरंगाबाद.
दिनांक - १९-०६-२०२६

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

सत्यमेव जयते

**जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर,**
**शाखा भूसंपादन, जायकवाडी प्रकल्प.**
कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक (०२४०)२.३.३४५०१-५
ई-मेल deputycollectorjp@gmail.com

जा.क. २०२६/भूसंपादन/जा.प्र./कावि दिनांक: ११/०६/२०२६

## भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अधिसूचना- कलम १९

ज्याअर्थी, ०३/२००९ समुचित शासन असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांचे मार्फत उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, जायकवाडी प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर यांनी भूमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त व अधिनियम छ असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन अधिसूचना. शासन राजपत्र क्र. ९ गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी ५-११, २०२६ **माघ १६-२२, शके १९४७, महाराष्ट्र टाइम्स ०१.०२.२०२६, दैनिक सामपत्र ३१.०१.२०२६** अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे. त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि, ज्याअर्थी, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, जायकवाडी प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे कलम १५ च्या पोट कलम (२) अन्वये कोणत्याही खातेदारांनी आक्षेप नोंदविलेला नाही. उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी. उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, जायकवाडी प्रकल्प, छत्रपतो संभाजीनगर यास पनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**
**जमिनीचे वर्णन**
गाव :- **हकीगतपुर, मांजरी, मुद्देश वाडगाव** तालूका **गंगापूर** जिल्हा : **छत्रपती संभाजीनगर**

| अ.क्र. | गट क्र. | एकुण संपादीत क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|
| | | **मौजे हकीगतपुर** | |
| १. | १६ | ०.०३ | |
| २ | १६ | ०.०३ | |
| ३ | १६ | ०.०३ | |
| ४ | १६ | ०.०३ | |
| ५ | १६ | ०.०५ | |
| ६ | १७ | ०.०५ | |
| ७ | १७ | ०.०७ | |
| ८ | १७ | ०.०७ | |
| ९ | १७ | ०.०५ | |
| १० | १८ | ०.१२ | |
| ११ | १८ | ०.१२ | |
| १२ | १५ | ०.४४ | |
| १३ | १४ | ०.३८ | |
| १४ | १४ | ०.०२ | |
| १५ | १४ | ०.०४ | |
| १६ | १४ | ०.०४ | |
| १७ | १३ | ०.०९ | |
| | **एकुण** | **१.६६** | |

| अ.क्र. | गट क्र. | एकुण संपादीत क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|
| | | **मौजे मांजरी** | |
| १ | २२५ | ०.०९ | |
| २ | २२५ | ०.०५ | |
| ३ | २२५ | ०.०३ | |
| ४ | २२५ | ०.०३ | |
| ५. | २२५ | ०.०३ | |
| ६ | २२५ | ०.०३ | |
| ७ | २२४ | ०.०२ | |
| **८** | **एकूण** | **०.२८** | |
| | | **मौज मुददेशवाडगाव** | |
| १ | ३५ | ०.३१ | |
| २ | ३६ | ०.२६ | |
| ३ | ३७ | ०.३० | |
| **एकुण** | | **०.८७** | |
| **एकुणात एकुण** | | **२.८१** | |

संपादनाचे प्रयोजन :- नांदूर मधमेश्वर प्रकल्प शाखा कालवा क्र. ०१ वितरीका क्र. ०१ (ब) मौजे हकीगतपुर, मांजरी, मुददेश वाडगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर अे. आर.क्र. ०३/२००९

**अनुसूची-दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

प्रकल्पाचे नांव :- **नांदूर मधमेश्वर प्रकल्प शाखा कालवा क्र. ०१ वितरीका क्र. ०१ (ब) मौजे हकीगतपुर, मांजरी, मुददेश वाडगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर अे.आर.क्र. ०३/२००९**

प्रकल्पाचे कामाचे वर्णन :- **नांदूर मधमेश्वर प्रकल्प शाखा कालवा क्र. ०१ वितरीका क्र. ०१ (ब) मौजे हकीगतपुर, मांजरी, मुददेश वाडगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर अे.आर.क्र. ०३/२००९**

**समाजाला होणारे लाभ :-**

अ) या प्रकल्पव्दारे जमिनीस सिंचनाचा फायदा होणार आहे.
ब) या योजने अंतर्गत गंगापुर तालुक्यातील आवर्षणग्रस्त गावांना त्याचा लाभ होणार आहे.
क) या योजनेमुळे हकीगतपुर, मांजरी, मुददेश वाडगाव ता. गंगापूर या गावाचे क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

**अनुसूची- तीन**
**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

मौजे हकीगतपुर, मांजरी, मुददेश वाडगाव तालुका गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर नांदूर मधमेश्वर प्रकल्प शाखा कालवा क्र. ०१ वितरीका क्र. ०१ (ब) मौजे हकीगतपुर, मांजरी, मुददेश वाडगाव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर अे.आर.क्र. ०३/२००९ येथील क्षेत्र २ हे. ८१ आर संपादित करावयाच्या सदर क्षेत्रामध्ये फक्त शेत जमिन येत असून, गावठाणे विस्थापित होत नाही. सबब विस्थापितांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची- चार**
**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करण्याच्या अधिकरणाने दिलेला)**
**(सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश)**
निरंक

**अनुसूची-पाच**
**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल**

अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-यांचे पदनाम :- लागू नाही.
ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक
क) ज्या अधिसुचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. त्या अधिसूचनेचा तपशील :- निरंक
टीप :- उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, जायकवाडी प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात निरिक्षण करता येईल.
दिनांक :- ११/०६/२०२६
ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर

**स्वाक्षरीत/-**
**(विनय गौडा जी.सी. भाप्रसे)**
**जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर**

जिमाका/छ.स.न/जाहि/६१/२०२६-२०२७